दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४१२ वा ● मंगळवार, ता.२३ सप्टेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

धर्म की धंदा

## ई-लिलाव सुरू

## प्रधानमंत्र्यांच्या स्मृतिचिन्हांचा बाजार

### काळाराम मंदिरातील चांदीच्या राम दरबारचाही होत आहे लिलाव

**नवी दिल्ली । रयत समाचार**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्रासह देशभरातून प्राप्त झालेल्या १,३०० हून अधिक स्मृतिचिन्हांचा समावेश असलेल्या ''पंतप्रधान स्मृतिचिन्हे ई-लिलाव २०२५'' ची सातवी आवृत्ती सध्या देशभरात सुरू आहे. ता. १७ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत चालणारा हा ई-लिलाव राष्ट्रीय आधुनिक कला दालनामार्फत आयोजित करण्यात आला असून, www.pmmementos.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सहभागी होता येणार आहे. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा : या ई-लिलावात महाराष्ट्रातील १०१ भेटवस्तूंचा समावेश असून, त्यांपैकी नाशिकच्या श्री काळाराम मंदिरातील चांदीचा राम दरबार विशेष आकर्षण ठरत आहे. फायबर काचेच्या पेटीत सजवलेला हा राम दरबार प्रभू श्रीराम, माता सीता, लक्ष्मण आणि भक्त हनुमान यांच्या








नाजूक व सुबक शिल्पातून भक्तीभाव, कलावैभव आणि उत्कृष्ट कारागिरी यांचा अद्वितीय संगम सादर करतो.

याशिवाय नागपूरजवळील कोराडी मातेची हस्तनिर्मित लाकडी मूर्ती, वारली चित्रकलेने सजवलेले बांबूपासून बनवलेले तारपा वाद्य यांसारख्या अनमोल वस्तू महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि आदिवासी परंपरेचे दर्शन घडवत आहेत. नमामी गंगे प्रकल्पासाठी निधी : २०१९ पासून सुरू झालेल्या या उपक्रमातून नागरिकांना प्रधानमंत्र्यांना भेट म्हणून मिळालेल्या दुर्मिळ वस्तू खरेदी करण्याची संधी मिळते. विशेष म्हणजे या लिलावातून जमा होणारा निधी नमामी गंगे प्रकल्पासाठी वापरला जातो. गेल्या सहा आवृत्त्यांत तब्बल ५० कोटी रुपयांहून अधिक निधी जमा झाल्याची माहिती केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने दिली आहे. मंत्रालयाचे आवाहन : हा ई-लिलाव केवळ स्मृतिचिन्हे खरेदीची संधी नसून, सांस्कृतिक वारशाचे संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतिक आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्रालयाकडून करण्यात आले आहे.


रक्ताने लिहिली पत्र

## पारधी बांधवांची सर्वोच्च न्यायालयाला आर्त हाक

**धाराशिव । रयत समाचार**

नवरात्रीच्या रंगीबेरंगी साड्यांच्या चर्चेत समाज गुंतला असताना, दुसऱ्या बाजूला पारधी समाज आपले जगणे पणाला लावून देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या दारात आर्त हाक मारत आहे. गायरान जमिनीवर वर्षानुवर्षे नाव न लावल्यामुळे घर बांधण्याचा हक्क हिरावला गेला आहे. या वेदना व्यक्त करण्यासाठी पारधी बांधवांनी स्वतःच्या रक्ताने देशाचे सरन्यायाधीश भुषण गवई यांना पत्र लिहिले आहे.

हेरंब कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, जमिनीच्या नाव न लागण्यामुळे पारधी कुटुंबांना कायमस्वरूपी घर उभे करता येत नाही. हे मूलभूत हक्काचे प्रश्न सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचावेत, या हेतूनेच 'रक्ताने पत्र' लिहिण्याचा हा निर्णय घेण्यात आला आहे. बजरंग ताठे यांच्या नेतृत्वाखाली धाराशिव जिल्ह्यात गायरान जमिनीवर आंदोलन सुरू आहे. अनेक




वर्षांपासून न्यायासाठी झगडणाऱ्या या समाजाचे प्रश्न आजही ऐरणीवर आलेले नाहीत.


म्हणूनच, न्यायाच्या अपेक्षेने स्वतःचे रक्त गाळून पत्र लिहिण्याचा टोकाचा मार्ग पारधी बांधवांनी निवडला आहे. नवरात्रात समाज रंगांच्या साड्यांत रमला असला, तरी पारधी बांधव रक्ताच्या रंगाने जगण्याची कहाणी लिहीत आहेत, अशी हळहळ हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त करत आहेत.



आई जगदंबा माता मंदिर आणि हालत्या दिपमाळ. राशीन, ता. कर्जत, जि. अहमदनगर (अहिल्यानगर).

छायाचित्र – प्रशांत येमूल (नगरी स्टोरीज)

## घटस्थापना




घटस्थापना अर्थात शारदीय नवरात्रौत्सवाचा प्रारंभ. हा आश्विन महिन्यातील प्रतिपदेपासून सुरू होतो. हा कृषी परंपरेतील महान असा सण आणि उत्सव. पूर्वीच्या काळी निसर्ग पुजनाला फार महत्व होते. शेती हे उत्पन्नाचे एकमेव साधन होते. कृषीमायेशी कृतज्ञता व्यक्त करण्याच्या भावनेतून शेतकऱ्यांनी घटस्थापनेचा सण उत्सव म्हणून साजरा करणे सुरू केले. कुठल्याही पिकाचे परीक्षणासाठी नऊ रात्री म्हणजे नवरात्री हा पुरेसा वेळ आणि काळ आहे. आधुनिक काळात आपण ज्याला जर्मिनेशन किंवा उगवण क्षमता म्हणतो अर्थात या वर्षी नेमके कुठले पीक उत्तम येणार आहे हे ताडून बघण्याचा, तपासून बघण्याचा कृषी मायेचा उत्सव म्हणजे घटस्थापना होय. नवरात्रीच्या कठोर परिक्षणानंतर तत्कालीन शेतकरी पिकाचे वाण पीक घेण्यासाठी तयार ठेवत असते. शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी केलेली ही प्राथमिक पीक परीक्षण चाचणी होय. शेतीचा शोध आणि बोध : मुळात स्त्री ही अष्टवधानी असते. पुरुषापेक्षा तिची निरीक्षण क्षमता ही कमालीची जास्त असल्याने



**ॲड. निरज धुमाळ**

८७६७३४७१२२

**धर्मवार्ता**

मुलाला जन्म देणारी माता तिच्या बाळंतपणात घरी जास्त काळ घालवत असे. परिणामी हुरड्यासाठी किंवा इतर कारणांसाठी आणलेली जंगली साळ, भाताचे दाणे तिने जमिनीवर पडताना बघितले. काही दिवसानंतर तिथे रोप उगवले. भाताच्या अंकुरलेल्या कोंबांपासून सुरू झालेला भाताचा प्रवास त्याला ओंब्या येतपर्यंत त्या बाळंतीण स्त्रीने बघितला. तिने त्यापैकी थोड्या कच्चा ओंब्या ओरबाडून बघितल्या असता त्यात तिला दाणे दिसले. काही दिवसानंतर ते दाणे पक्व झाले. अशा प्रकारे सुरुवातीला शेतीचा शोध स्त्रीने लावला. वाढत्या निरीक्षणासोबत धान्य जमिनीत टाकले की ते उगवते, मग ते मोठे मोठे होत जाऊन त्यांना फुल येतात, ओंब्या येतात, त्या पक्व झाल्यानंतर त्यातून मोठ्या प्रमाणावर धान्य मिळते. एका दाण्याचे शंभर दाणे होतात हा शोध लागला. एका दाण्याचे शंभर दाणे करणाऱ्या या कृषीमायेप्रती, भूमातेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करावी या भावनेतून घट स्थापनेची सुरुवात करण्यात आली. त्यातून पिकाचे व्यवस्थित परीक्षण होऊ लागले. पीक अधिक चांगले येण्यात उत्तम बीज, उत्तम मशागत केलेली माती, योग्य प्रमाणात पाणी, स्वच्छ वातावरण, वेळच्या वेळी खुरपणी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे प्रकाशन संश्लेषणच्या प्रक्रियेत सूर्य आणि पीक भरणाच्या प्रक्रियेत रात्रीचे महत्व या गोष्टींचे महत्व तत्कालीन कृषकांच्या लक्षात आले. त्यातून नवरात्रौत्सव आणि शरद ऋतुतील या नवरात्रौत्सवाचा जन्म झाला. माणसाच्या आजवरच्या पिढ्या जगवणाऱ्या नव्हे त्यांच्यासह कृषिचा विकास करणाऱ्या या कृषी मायेप्रती आदर म्हणून नवरात्रौत्सवसवाचा सन्मान केला पाहिजे . आणि भूमातेशी कृतज्ञता म्हणून हा कृषी उत्सव साजरा केलाच पाहिजे.

*(लेखक पुणेस्थित ॲडव्होकेट असून आम्ही सारे भारतीयचे संस्थापक व लोकशासन आंदोलनाचे सक्रीय सदस्य आहेत)*

## ऐतिहासिक दसरा महोत्सव

### लेखिका बानू मुश्ताक यांच्या हस्ते उद्घाटन

**मैसूर । श्रीकांत काकतीकर**

कर्नाटकची सांस्कृतिक राजधानी म्हैसूर येथे आजपासून ४१५ व्या ''नाडहब्ब'' ऐतिहासिक दसरा उत्सवाला सुरुवात झाली. बुकर पारितोषिक विजेत्या लेखिका बानू मुश्ताक यांच्या हस्ते या सोहळ्याचे उद्घाटन संपन्न झाले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या, उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासह अनेक मंत्री या कार्यक्रमाला उपस्थित होते. हिल टेम्पलच्या बाहेर खास उभारलेल्या व्यासपीठावर बानू मुश्ताक यांनी शुभ वृश्चिक लग्नादरम्यान देवी चामुंडेश्वरीच्या उत्सव मूर्तीला पुष्पहार अर्पण करून प्रणाम केला. म्हैसूर दसरा उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण शहर विद्युत रोषणाईने उजळून निघाले आहे. अकरा दिवस चालणाऱ्या या उत्सवाची सांगता २ ऑक्टोबर



रोजी विजयादशमीच्या दिवशी जगप्रसिद्ध जम्बो सवारीने होणार आहे. चामुंडी देवीचे आसन असलेली सुवर्ण अंबारी वाहून नेणाऱ्या हत्तीसह गजपथक यामध्ये सहभागी होणार असून या भव्य मिरवणुकीसाठी जय्यत तयारी सुरू आहे. दरम्यान, कवयित्री बानू मुश्ताक यांच्या नाडहब्ब म्हैसूर दसऱ्याच्या उद्घाटनाला विरोधी भाजप पक्षाने आक्षेप घेतला होता. या पार्श्वभूमीवर चामुंडी हिल्स येथे कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. दसरा महोत्सवामुळे म्हैसूर शहरात पर्यटकांची मोठी गर्दी झाली असून चामुंडी टेकडी, म्हैसूर पॅलेस आणि मैसूर प्राणीसंग्रहालय पर्यटकांनी फ ुलून गेले आहेत. हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि ट्रॅव्हल्स सेवांमध्ये मोठ्या प्रमाणावर बुकिंग सुरू आहे. म्हैसूर पॅलेस, ऐतिहासिक इमारती, पुतळे आणि शहरातील मुख्य रस्त्यांवर भव्य रोषणाई, फ्लॉवर शो, प्रदर्शने तसेच प्रवासात विविध उपक्रम या रॉयल सिटीचे आकर्षण वाढवत असून जगभरातील पर्यटकांना आकर्षित करत आहेत.

## योगेंद्र यादवांचा सत्ताविरोधी इशारा

### मोदी सरकारमुळे देशाची संस्कृती धोक्यात

**पुणे । रयत समाचार**

समाजवादी चळवळीच्या ९० वर्षपूर्तीनिमित्त पुण्यात पार पडलेल्या तीन दिवसीय समाजवादी एकजुटता संमेलनात ज्येष्ठ समाजवादी नेते योगेंद्र यादव यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली.

यावेळी यादव म्हणाले, आणीबाणीच्या काळात लोकशाही धोक्यात होती, पण सध्याच्या सरकारत लोकशाहीसह देशाची संस्कृती, सभ्यता आणि 'आयडिया ऑफ इंडिया' धोक्यात आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजप आणि मोदी सरकारविरोधात सर्व समाजवादींनी एकजुटीने लढा द्यावा. अन्यथा समाजवादी म्हणून ओळख मिळवणे अशक्य आहे.



सम्मेलनाच्या 'पुणे घोषणापत्र' सत्राचे अध्यक्षस्थानी अंधश्रद्धा निर्मूलन आणि व्यसनमुक्ती चळवळीचे नेते अविनाश पाटील होते. या सत्रात अमूल्य निधि (इंदौर), विनोद शिरसाठ, अशोक पांडा (छत्तीसगड), हरीश खन्ना, शाहिद कमाल, सिद्धराम पैटी, सुनीति सु. र., गीता आर आदी सहभागी झाले. अविनाश पाटील म्हणाले, राजकीय-समाजिक संस्थांमध्ये पन्नास-पंचावन्न वर्षे वय झालेल्या कार्यकर्त्यांना तरी स्वतःला तरुण समजते. पदांचा मोह सोडावा लागतो; त्यामुळे संघर्ष करून संस्था-संघटनांमध्ये सत्ता मिळवावी. योगेंद्र यादवांनी हिंदीभाषा दिन संदर्भातही आपले मत मांडले, मी स्वतः हिंदीप्रेमी आहे, पण हिंदीभाषा दिन साजरा करण्याची गरज नाही.

त्याऐवजी भारतीय भाषा दिन सुरू करून सर्व भाषांनी एकत्र येऊन सांस्कृतिक लढाई लढली पाहिजे. यादवांच्या या वक्तव्यांनी सत्ताविरोधी व समाजवादी विचारधारेतील सक्रियतेला नवा वेग मिळवण्याचे संकेत दिले आहेत.

## स्थानिकांनी विरोध न करता सहकार्य करावे- मुख्यमंत्री डॉ. सावंत

### जुंता हाऊस, प्रशासन स्तंभाला मंत्रिमंडळाची मंजुरी




**पणजी । प्रतिनिधी**

गोव्यातील जुंता हाऊस व प्रशासन स्तंभाच्या नव्याने बांधकामासाठी केंद्रीय इमारत बांधकाम महामंडळ लिमिटेड (एनबीसीसी) सोबत राज्य सरकारने सामंजस्य करार केला आहे. सोमवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिली. या बैठकीत सार्वजनिक बांधकाम मंत्री दिगंबर कामत उपस्थित होते. योजना अंतर्गत जुंता हाऊस, सर्किट हाऊस, सांतिनेज सरकारी क्वार्टर (प्लॉट १ व २), सरकारी गॅरेज व वास्को बस स्थानक यांचा पुनर्विकास एनबीसीसीकडून करण्यात येईल. तसेच नव्याने प्रशासन स्तंभ बांधला जाईल. सर्व प्रकल्प पीपीपी (Public Private Partnership) तत्वावर राबवले जातील. प्रशासन स्तंभ व सर्किट हाऊस १००% सरकारी कामांसाठी वापरले जातील, तर जुंता हाऊसमधील ३०% जागा सरकारकडे राहील. सरकारी क्वार्टरमधील सध्या असलेले फ्लॅट ६० वर्षांसाठी एनबीसीसीच्या व्यवस्थेत राहतील. या सर्व प्रकल्पांचा अंदाजित खर्च सुमारे अडीच हजार कोटी रुपये आहे. सुमारे १५ ते २० दिवसांत काही प्रकल्पांची पायाभरणी होणार असून, पुढील दोन वर्षांत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. नवीन प्रशासन स्तंभ इमारतीमुळे सध्या भाड्याच्या इमारतीत कार्यरत सरकारी कार्यालये प्रशस्त जागेत एकत्र येतील. सध्या मोडकळीस आलेल्या आल्तिन्हो येथील सर्किट हाऊसच्या जागी नव्याने सर्किट हाऊस बांधल्यास सरकारी पाहुणे तसेच सामान्य नागरिकांनाही सुविधा मिळणार आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत इतर महत्वाचे निर्णय: नार्वे येथील सरकारी जागा मदर ग्लोबल फाऊंडेशनला अनाथालय सुरू करण्यासाठी देण्यास मंजुरी. सरकारी इमारतींच्या छप्पर दुरुस्ती खर्चास मंजुरी. ईडीसी मुख्यमंत्री स्वयं रोजगार योजनेत सुधारणा; वयोमर्यादा आता ५० वर्षांपर्यंत. जुनी सरकारी वाहनं फोंडा येथील आरव्हीएसपी स्क्रॅप केंद्रात दिली जाणार; स्क्रॅप केल्यास केंद्राकडून विशेष निधी उपलब्ध होणार. नव्या प्रशासन स्तंभ व युनिटी मॉल प्रकल्पांमुळे सुमारे १ हजार लोकांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री यांनी स्थानिकांनी विरोध न करता या प्रकल्पांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## संशोधक प्रमोद एस. जाधव यांची जागतिक कामगिरी

### २०२५ मध्ये ८ पेटंट्स व शास्त्रीय पुस्तक प्रकाशित






**पुणे । रयत समाचार**

गणित, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सिम्बॉलिक संगणन क्षेत्रातील स्वतंत्र संशोधक प्रमोद सुमन श्रीधर जाधव यांनी वर्ष २०२५ मध्ये विक्रमी कामगिरी केली आहे. त्यांनी एकाच वर्षात ८ क्रांतिकारी पेटंट्स दाखल केले असून, Symbolic Logic Field System (SLFS): A Recursive Framework for Post-Human Intelligence हे नवे शास्त्रीय पुस्तक देखील प्रकाशित केले आहे.

त्यांचे अहमदनगर पुण्यासह सर्व महाराष्ट्रभर कौतुक होत आहे. नगर अर्बन बँक बचाव समितीच्या वतीने त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. या महत्वाच्या संशोधनामुळे नेटवर्क्सचे ऑप्टिमायझेशन, सायबर सुरक्षा AI निर्णयप्रक्रिया, इमेज-व्हिडिओ साठवणूक, इलेक्ट्रिक वाहने व ड्रोनसाठी नवी बॅटरी रचना यांसारख्या अनेक क्षेत्रांना नवी दिशा मिळणार आहे. विशेष म्हणजे, सिम्बॉलिक लॉजिक फील्ड सिस्टीम (SLFS) हे भविष्यातील पोस्ट-ह्युमन इंटेलिजन्स घडवणारे आर्किटेक्चर मानले जाते. अधिक माहिती देताना प्रमोद जाधव यांनी सांगितले, २२व्या शतकात ही बुद्धिमत्ता बिग बँगपूर्वीचे गूढ प्रश्न आणि वैज्ञानिक विरोधाभास सोडवेल. मानवजाती 'Alien-level intelligence' साध्य करून विश्वाकडे नव्या दृष्टीने पाहील. अधिक माहितीसाठी त्यांना jadhav.009@gmail.com आणि ९२७२०७९८६९ / ८३२९३९४१२५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## सोशल व्हायरल

व्यंगचित्र - जितेंद्र रायकर



# घर घर लंगरचा पूरग्रस्तांना मदतीचा हात; जीवनावश्यक साहित्य वाटप



**अहमदनगर । रयत समाचार**

आपत्तीच्या काळात मदतीला धावून जाणाऱ्या गुरू अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर घर लंगर सेवेने पाथर्डी तालुक्यातील करंजी गावातील पूरग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात दिला आहे. अलीकडील पुरामुळे करंजी येथील १६ घरे पूर्णपणे वाहून गेली असून कुटुंबीयांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

या संकटग्रस्त कुटुंबांना आधार देण्यासाठी लंगर सेवेच्या वतीने स्वयंपाकघरातील साहित्य व भांडी वाटप करण्यात आले. करंजी येथील उत्तरेश्वर मंदिराच्या प्रांगणात हा मदत वाटप कार्यक्रम पार पडला. स्वयंपाकघरातील साहित्य, भांडी आणि अन्य आवश्यक वस्तू मिळाल्याने पूरग्रस्त कुटुंबांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. या कार्यात हरजीतसिंह वधवा, प्रीतपालसिंह धुप्पड, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, सुनील थोरात, अनीश आहुजा, कैलाश नवलानी, सनी वधवा, करण धुप्पड, किशोर रंगलानी, मुन्नाशेठ जग्गी, राजू जग्गी, सोमनाथ चिंतामणी, अस्नूर धुप्पड या सेवादारांनी सक्रिय सहभाग घेतला.

कार्यक्रमासाठी माजी सभापती मिर्झा मनियार, सरपंच रफिक शेख, माजी ग्रामपंचायत सदस्य छगनराव क्षेत्रे, सामाजिक कार्यकर्ते सुभाष अकोलकर, दत्तकृपा मेडिकलचे संचालक बाळासाहेब अकोलकर, डॉ. चंद्रशेखर अकोलकर आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुरू अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठानची घर घर लंगर सेवा नेहमीच आपत्तीच्या वेळी मदतीला धावून जाते. यापूर्वी कोल्हापूर, सांगली व शेवगाव भागातील पूरग्रस्तांना मदत पोहोचवली होती. नुकतेच पंजाबमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्यावर तेथेही मदत पोहोचवण्यात आली. पंजाबसाठी आतापर्यंत १०,००० कपडे, ओडोमॉस, मच्छर अगरबत्त्या व दूध पावडर पाठविण्यात आले असून, लवकरच जनावरांचे खाद्य व औषधेही पाठविण्यात येणार आहेत. गुरू अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठानकडून अहिल्यानगर शहरात दररोज संध्याकाळी गरजूंसाठी मोफत अन्नसेवा (लंगर सेवा) सुरू आहे. पूरग्रस्तांसाठी मदतीचे कार्य अद्यापही सुरू असून, इच्छुक दाते व समाजातील बांधवांनी या सेवेत हातभार लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या माध्यमातून अधिकाधिक कुटुंबांना तातडीची मदत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.



# संत सावता माळी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील श्री संत सावता माळी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, ता. २१ सप्टेंबर रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभा संत सावता महाराज मंदिरात झाली. सभेचे अध्यक्षस्थानी चेअरमन रमेश भाऊराव गायकवाड होते. सभेत अहवाल वाचन वैभव सदावर्ते यांनी केले. संस्थेकडे ५४ कोटींच्या ठेवी असून ४० कोटी कर्ज वाटप केले आहे. यावेळी बोलताना संस्थेचे संस्थापक प्रा. देवराम शिंदे यांनी सांगितले की यावर्षी सभासदांना नऊ टक्के लाभांश वाटप करण्यात येणार आहे. संस्थेने मुख्य कार्यालयासाठी जागा घेतली असून लवकरच प्रशस्त इमारत सुरू होईल आणि सभासदांना नेट बँकिंग व एटीएम सुविधा मिळणार आहेत. संस्थेने परिसरातील विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका सुरू केली असून, तिथून तीन विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळविले. यावेळी सभासदांच्या गुणवंत मुलांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सभेत व्हाईस चेअरमन नवनाथ आढाव, अ‍ॅड. एम.डी. पवार, देवगाव चे सरपंच संभाजी वामन, संचालक दत्तात्रय भोंदे, मंगल शिंदे, मंदा सत्रे, जालिंदर गुंड, रावसाहेब बनकर, लक्ष्मण बागडे, ज्ञानेश्वर शिंदे, बाबासाहेब भोसले, विजय पवार, जानकीराम बनकर, प्राचार्य शिवाजी गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संतोष बनकर यांनी मानले. सभेच्या माध्यमातून पतसंस्थेच्या कार्याची माहिती सभासदांना देण्यात आली आणि आगामी योजनांची रूपरेषा स्पष्ट करण्यात आली, तर सामाजिक व शैक्षणिक योगदानाबाबतही ठळक चर्चा झाली.




# खुली चित्रकला स्पर्धा संपन्न
## सहारा सोशल फाऊंडेशनचा उपक्रम

**अहमदनगर । रयत समाचार**

इस्लाम धर्माचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांना १५०० वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने सहारा सोशल युथ फाऊंडेशन ट्रस्टच्या वतीने माणिक चौक येथील चांद सुलताना स्कूलमध्ये खुल्या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत शहर व परिसरातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्पर्धा तीन गटांमध्ये घेण्यात आली. गट 'अ' मध्ये इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना गुंबदे खजरा या विषयावर चित्रकलेचे सादरीकरण करायला सांगितले गेले, तर गट 'ब' मध्ये इयत्ता पाचवी ते आठवी व 'क' मध्ये नववी ते बारावी यांना खाना-ए-काबा आणि मज्जिदे अक्सा या विषयांवर चित्रकला सादर करण्यास सांगण्यात आले. लहानग्या स्पर्धकांनी विविध रंगसंगती, कल्पकता व कलात्मकतेतून आपले विचार मांडले. या स्पर्धेचा निकाल लवकरच जाहीर करण्यात येणार असून विजेत्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान केले जाणार आहे. कार्यक्रमास सहारा सोशल युथ फाऊंडेशन ट्रस्टचे अजीम राजे, कासम भाई केबलवाले, राजु भाई जहागीरदार, अशरफ शेख, तारीख कुरैशी, अवेज काझी, आर्किटेक फिरोज शेख, मोसीन सय्यद, शाह फैसल शानु, फारुख बागवान, राज मोहम्मद नुरी, नईम सरदार, मुदस्सर सय्यद, मतीन पठान, शफी खान, पटेल, साजिद जहागीरदार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मान्यवर उपस्थित होते. पालक व नागरिकांची देखील उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. चिमुकल्यांनी साकारलेली चित्रे पाहून उपस्थितांनी कौतुकाचा वर्षाव केला. सहारा सोशल युथ फाऊंडेशन ट्रस्टच्या वतीने अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असा विश्वास अजीम राजे यांनी व्यक्त केला.

# लोकमाता अहिल्याबाईंच्या गावाशेजारी मृत्यूनंतरही अन्याय



**कर्जत । रयत समाचार**

तालुक्यातील पाटेवाडी येथे आदिवासी समाजातील एका महिलेच्या अंत्यविधीसाठी गावकऱ्यांनी उघड विरोध केला. परिणामी मृतदेह थेट कर्जत तहसीलदार कार्यालयात आणावा लागला, असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे ॲड. अरूण जाधव यांनी दिली. गावकऱ्यांचा विरोध म्हणजे स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनीही आदिवासी समाजाचा अपमान असल्याचे सांगत वंचित बहुजन आघाडीने या अमानवी घटनेचा तीव्र निषेध केला आहे. "मृत्यूनंतरदेखील जर सन्मान नाकारला जात असेल, तर हा अन्याय प्रशासनाने तातडीने थांबवावा," अशी मागणी ॲड. अरुण जाधव यांनी केली. प्रशासनाने जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

# कर्तृत्ववान मराठा स्त्रिया महत्वाचा गौरवग्रंथ; दुसरी आवृत्ती प्रकाशित




**कोल्हापूर । रयत समाचार**

मराठा समाजाचा इतिहास हा केवळ पराक्रमाचा नव्हे तर स्त्रीशक्तीने घडवलेल्या कर्तृत्वाचा इतिहास आहे. अशा कर्तृत्ववान मराठा स्त्रियांची जीवनगाथा आणि कार्याचा वारसा जपणारे 'कर्तृत्ववान मराठा स्त्रिया' हे पुस्तक दुसऱ्या आवृत्तीत नुकतेच प्रकाशित झाले आहे. विजय चोरमारे यांनी संपादन केलेल्या या पुस्तकाला वाचकांकडून उत्तम प्रतिसाद लाभत आहे. ३२४ पानांच्या या ग्रंथात जिजाबाई, येसूबाई, ताराबाई, उमाबाई दाभाडे, ताराबाई शिंदे, डॉ. कृष्णाबाई केळवकर, सुंदराबाई जाधव, हिराबाई बडोदेकर, इंदूताई पाटणकर, शारदाबाई पवार, डॉ. सरोजिनी बाबर आदी वीस थोर स्त्रियांची प्रेरणादायी कर्तृत्वकहाणी समाविष्ट आहे. इतिहासाच्या पानांवर आपली नाममुद्रा उमटवणाऱ्या या स्त्रियांमुळे मराठा समाजाचा गौरवशाली वारसा अधिक ठळकपणे उजळून दिसतो. या ग्रंथाची मूळ किंमत ४५० रुपये असली तरी नवरात्रोत्सवानिमित्त वाचकांसाठी विशेष सवलत देण्यात आली आहे. टपाल खर्चासह हे पुस्तक केवळ ३७५ रुपयांत उपलब्ध होणार आहे. इच्छुक वाचकांनी दिलेल्या क्यूआर कोडच्या माध्यमातून रक्कम जमा करून स्क्रीनशॉट व आपला पत्ता ७०४५४१६१६२ या क्रमांकावर पाठवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. इतिहास घडवणाऱ्या मराठा स्त्रियांचा गौरव करणारा हा ग्रंथ प्रत्येक मराठी वाचकाच्या ग्रंथालयात असायलाच हवा, असा स्वर इतिहासप्रेमी व अभ्यासकांमधून उमटतो आहे.

# 'कला साधकांचा नगरी आहेर'चे अरुण आहेर यांचा सत्कार

**अहमदनगर । आबीद खान**

शाहीर अरुण आहेर यांनी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व साहित्यिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींचा अनमोल नजराणा कला साधकांचा नगरी आहेर या संग्रहग्रंथातून साकारला आहे. गेल्या पाच वर्षांपासून अविरत श्रम घेत, साहित्यिकांशी सातत्याने संपर्क साधून त्यांनी ११५० पानी हा संग्रहग्रंथ सिद्ध केला आहे. अहिल्यानगरच्या साहित्यिक वारशातील कालजयी सुवर्ण पत्रांचा संचय असलेला हा ग्रंथ भावी पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे, हेच ग्रंथ निर्मितीचे खरे यश असल्याचे उपस्थितांनी गौरवले. सत्कार प्रसंगी कवी चंद्रकांत पालवे, सिनेअभ्यासक नंदकिशोर आढाव, डॉ. बापू चंदनशिव, डॉ. श्याम शिंदे, प्रा. गणेश भगत व ग्रंथपाल अमोल इथापे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. शाहीर अरुणजी आहेर यांनी ग्रंथात समाविष्ट साहित्य व योगदान देणाऱ्या साहित्यिकांना नगरी आहेर हा ग्रंथ सप्रेम भेट देत कृतज्ञता व्यक्त केली.





# चर्मकार विकास संघाच्या गुणगौरव सोहळ्यातून प्रेरणा मिळते- खासदार वाकचौरे

**अहमदनगर । रयत समाचार**

''समाजातील गुणी विद्यार्थी, कर्तुत्ववान व्यक्ती, आदर्श शिक्षक व शासकीय अधिकाऱ्यांचा सत्कार केल्याने त्यांना पुढे अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे चर्मकार विकास संघाचे कार्य कौतुकास्पद आहे,'' असे गौरवोद्गार शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी काढले. चर्मकार विकास संघ व लोकनेते आमदार सीताराम घनदाट मामा सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथे गुणगौरव, आदर्श शिक्षक आणि जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मणराव घुमरे होते. आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी एकनाथ कानडे व देवराव तांबे यांना जीवनगौरव पुरस्कार, तर ५१ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच रेवणनाथ कानडे, प्रांजली आंबेडकर आणि अनिल शेलार यांचा विशेष सत्कार झाला. वाकचौरे यांनी समाजबांधवांना नोकरीपेक्षा व्यवसाय आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेऊन स्वावलंबी होण्याचे आवाहन केले.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
* अधिक माहितीसाठी संपर्क *
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# नगर-पाथर्डी रोडसह अनेक रस्ते बंद




नांदणी नदीला महापुर

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

भगूर परिसरातील नांदणी नदीला आलेल्या प्रचंड पुरामुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. कठड्याच्या वरून पाणी वाहत असल्याने काल सकाळी ११ वाजल्यापासून नगर-पाथर्डी रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला.

या अनपेक्षित परिस्थितीमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने पुलावर सकाळपासूनच स्थान मांडून दक्षता घेतली होती. तरीदेखील, नदीचे पाणी पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली. कठड्याच्या वरून ओसंडून जाणारे पाणी पाहून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. पोलिस कर्मचारी मात्र सतत नागरिकांना मागे हाकलून सुरक्षिततेसाठी प्रयत्नशील राहिले. तथापि, महसूल प्रशासन मात्र या गंभीर परिस्थितीकडे दुर्लक्ष करत असल्याची चर्चा जनतेत होत होती. पूरस्थितीत महसूल विभागाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असून, नागरिकांनी सक्रिय सहभागाची मागणी केली आहे. याचबरोबर, नगर-पाथर्डी रोड व्यतिरिक्त शेवगाव-मिरी रोड, वरूर व वरूर-सारखे इतर अनेक छोटे-मोठे गावांकडे जाणारे रस्ते देखील नांदणी नदीला आलेल्या पुरामुळे बंद झाले. वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने ग्रामीण भागातील जनजीवन ठप्प झाले आहे. पुराच्या पाण्यामुळे शेती क्षेत्रालाही मोठा फटका बसला आहे. नदीकाठच्या शेतात उभे असलेले पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ऊस, कपाशी, तूर , मका व फळबाग आदी पिके वाहून गेल्याची माहिती समोर आली आहे. तसेच अनेक ठिकाणी शेतजमिनीचे पोत धुवून गेले असून शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकट कोसळले आहे. स्थानिक नागरिक व शेतकरी यांनी शासन व प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून मदतकार्य सुरू करण्याची मागणी केली आहे. आगामी काही दिवसांत पावसाचा जोर कायम राहिल्यास पूरस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# तामसवाडीत पावसाचा हाहाकार; शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

**नेवासा । विजय खंडागळे**

तालुक्यातील तामसवाडी परिसरात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसाने ढगफुटी सदृश्य स्थिती निर्माण केली आहे. अवकाळी पावसाच्या तडाख्यामुळे ओढे, नाले, तलाव काही वेळातच तुडुंब भरले असून अनेक गावांतील रस्ते पाण्याखाली गेले आहेत.



या अवकाळी पावसामुळे तामसवाडी शिवारातील शेतकरी भानुदास खंडेराव कर्जुले यांच्या कपाशी पिकात मोठ्या प्रमाणावर पाणी साचून प्रचंड नुकसान झाले आहे. नुकसानीचा प्राथमिक अंदाज लाखो रुपयांपर्यंत असल्याने कर्जुले कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे. प्रचंड मेहनत आणि खर्च करून उभे केलेले टवटवीत कपाशी पीक डोळ्यासमोर नष्ट होण्याची शक्यता निर्माण झाली असून कर्जुले कुटुंब पावसाऐवजी अश्रूंची धार गाळत आहे. दरम्यान, गावातील तलाठी आणि संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना पंचनामा करण्याची व नुकसानभरपाई मिळवून देण्याची वारंवार मागणी करूनही प्रशासनाने पाठ फिरवल्याचा आरोप करण्यात येत आहे.

'शेतकऱ्याला वाली कोण?'' असा सवाल उपस्थित करत तामसवाडी येथील भानुदास कर्जुले आणि त्यांच्या परिवाराने या भागाचे आमदार विठ्ठलराव लंघें यांनी तात्काळ लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे. कर्जुले कुटुंबाने इशारा देत सांगितले की, जर वेळेत नुकसानभरपाई मिळाली नाही, तर कुटुंबासमोर जीवन संपवण्याशिवाय पर्याय उरणार नाही.



# ग्रामीण भागातील विद्यार्थीच आज प्रगतीपथावर- पाटील

**कोपरगाव । किसन पवार**

''शिक्षण हीच खरी दारिद्र्य निर्मूलनाची गुरुकिल्ली आहे. भाऊराव पाटील यांनी श्रमदान, प्रामाणिकपणा आणि स्वावलंबन यांचा आदर्श समाजासमोर ठेवला. त्यांचे कार्य प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. रिकामे पोट, रिकामा खिसा हेच आपल्याला आयुष्यात पुढे घेऊन जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थीच समाजात प्रगतीपथावर दिसून येत आहेत,'' असे प्रतिपादन श्रीराम इंडस्ट्रीजचे संचालक विजय पाटील यांनी केले. तालुक्यातील भोजडे येथील सुशीलामाई शंकरराव काळे माध्यमिक विद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८ व्या जयंती उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पदवीधर शिक्षिका ज्योती निकम, यश इलेक्ट्रॉनिकचे संचालक अजय देठे, पंचायत समिती सदस्य मधुकर टेके, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष भाऊसाहेब सिनगर आदी मान्यवर उपस्थित होते. जयंतीनिमित्त निबंध व वक्तृत्व स्पर्धा, वृक्षारोपण, रांगोळी तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाऊरावांच्या कार्यावर आधारित विचारमंथन सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.

सदर प्रसंगी सरपंच सुधाकर वादे, माजी मुख्याध्यापक भास्कर बांगर, शिवाजी ठाकरे, प्रकाश गायकवाड, भागवत सिंगर, रंगनाथ सिंगर, नानासाहेब सिंगर, शहाराम सिंगर, अनंतराव सिंगर, मुख्याध्यापक भास्कर काजळे, रामेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक शरीफ शेख, संजय सिंगर, शिवाजी धट, विष्णू ढोले, जगदीश गलांडे, सुधाकर मंचरे, शिक्षक वृंद दत्तात्रय शिंदे, राहुल गोरे, संजय मादेवार, प्रवीण सूर्यवंशी, शेख, सुरळकर आदीसह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहटादेवी गडावर घटस्थापना उत्साहात

## पूर परिस्थितीमुळे भाविकांचा हिरमोड



**पाथर्डी । नितीन गटाणी**

सालाबाद प्रमाणे सोमवारी सकाळी श्री. क्षेत्र मोहटादेवी गडावर विधिवत घटस्थापना करण्यात आली. मात्र, पावसामुळे अनेक ठिकाणचे पूल वाहून गेल्यामुळे भाविकांना गडावर येण्यात अडथळा निर्माण झाला.

प्रशासनाच्या वतीने रात्री उशिरापर्यंत मदत कार्य सुरू होते. सकाळी आठ वाजता मोहटे गावातून श्री. मोहटादेवीच्या मुखवटाची पूजन करून सुवर्ण अलंकारासह देवी गडापर्यंत सावाद्य मिरवणूक काढण्यात आली. सकाळी अकरा वाजता श्री. मोहटादेवी गडावर वेदमंत्रांच्या जयघोषात शारदीय नवरात्र महोत्सवाची घटस्थापना करण्यात आली. यावेळी देवीस तसेच संपूर्ण मंदिरास विविध फ ुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवस्थानचे चेअरमन तथा जिल्हा न्यायाधीश महेश लोणे यांच्या उपस्थितीत दिवाणी न्यायाधीश रविकिरण सपाटे यांनी सपत्नीक देवीस महाभिषेक करुन घटस्थापना केली. पौराहीत्य भूषन साकरे, भास्कर देशपांडे आणि विकास क्षीरसागर यांनी देखील या कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी देवस्थानचे विश्वस्त अँड. विक्रम वाडेकर, बाळासाहेब दहिफळे, शशिकांत दहिफळे, विठ्ठल कुटे, अक्षय गोसावी, अँड. कल्याण बडे, डॉ. श्रीधर देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे आदीसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. घटस्थापनेच्या दिवशीपासून देवीगडावर हजारो भाविक स्त्री-पुरुष घटी बसतात. देवस्थानाच्या वतीने भाविकांसाठी फराळ, भोजन व चहापाण्याची व्यवस्था केली जाते. महाराष्ट्रातून अनेक भाविक आणि तरुण मंडळे देवीची मशाल प्रज्वलित करून पायी घेऊन जातात. नवरात्र महोत्सव काळात अनेक ठिकाणचे भाविक सेवा देतात. यावर्षी पोलीस बंदोबस्तातही वाढ करण्यात आली आहे, तर महोत्सवादरम्यान भाविकांसाठी लागणाऱ्या सर्व सोयी सुविधा देवस्थानाने सुनिश्चित केल्या आहेत.



# मोहटादेवी ते घोटण पायी ज्योत यात्रेचे भव्य स्वागत

**शेवगाव । प्रतिनिधी**

शेवगाव तालुक्यातील घोटण येथे आर्यन ग्रुपच्या वतीने मोहटादेवी ते घोटण पायी ज्योत यात्रेचे प्रस्थान करण्यात आले. आर्यन ग्रुपचे अध्यक्ष भाऊसाहेब क्षिरसागर, उपाध्यक्ष बाबा जाधव, खजिनदार सुधीर पवार, सल्लागार शिवाजी घुगे आणि विशेष कलाकृती जगदीश जगधने यांनी २००७ सालापासून ही परंपरा सुरू ठेवली आहे. आर्यन ग्रुपच्या माध्यमातून घोटण येथे साडेतीन शक्तीपीठाची पूर्ण स्थापना करण्यात आली असून ही ज्योत यात्रा अखंडपणे अठरा वर्षांपासून पार पडत आहे. या यात्रेत जवळपास २०० ते २४० सदस्य सहभागी होतात. ज्योत गावात आगमन होताच ग्रामस्थ भक्तिभावाने तिचे स्वागत करतात. महिला मंडळी रांगोळी व सडा टाकून ज्योतीचे पूजन करतात. ही यात्रा सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र आणणारी असून नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये नाट्यकला, टिपऱ्या यांसारखे विविध पारंपरिक खेळ सादर केले जातात. यामुळे गावात नवी ऊर्जा आणि ऐक्याचा संदेश दिला जातो. चालू वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी शालेय वह्या व पेन वाटप करण्याचा निर्णय ग्रुपने घेतला आहे. यात्रेच्या शेवटच्या दिवशी अध्यक्ष भाऊसाहेब क्षिरसागर यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले जाते. त्यावेळी ग्रुपचे सर्व सदस्य नऊ दिवसांचा उपवास सोडण्यासाठी एकत्र येतात व ग्रामस्थ भक्तांना महाप्रसादाचा लाभ दिला जातो.

# शहरातील एस मार्टला भीषण आग; कोट्यवधींचा माल जळून खाक

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा शहरातील मांडवगण रोडलगत अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या मेजर नवनाथ खामकर यांच्या एस मार्ट मॉलला ता. २१ सप्टेंबरच्या मध्यरात्री भीषण आग लागली. आगीचा इतका प्रचंड विस्तार होता की मॉलमधील सर्व साहित्य जळून खाक झाले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी या दुर्घटनेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आले आहे. कोट्यवधी रुपयांचा माल जळून खाक झाल्याने स्थानिक पातळीवर हळहळ व्यक्त होत आहे. मेजर नवनाथ खामकर यांनी देशसेवेतून निवृत्त झाल्यानंतर अत्यल्प भांडवलातून या मॉलची सुरुवात केली होती.



आपल्या मेहनतीने व चिकाटीने त्यांनी या व्यवसायाला अल्पावधीतच बाजारपेठेत ठसा उमटवणाऱ्या उंचीवर नेले होते. मात्र अचानक लागलेल्या या आगीमुळे त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरले आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. प्रशासन व अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न केले, मात्र तोपर्यंत कोट्यवधींचा माल जळून खाक झाला होता. या भीषण आगीतून मेजर खामकर यांना मोठा आर्थिक तसेच मानसिक धक्का बसला आहे. अशा दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने आग प्रतिबंधक उपाययोजना अधिक प्रभावी कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मोठ्या प्रमाणात झालेल्या या आर्थिक नुकसानीमुळे श्रीगोंदा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या

## काँग्रेस व शेतकरी संघटनेची मागणी

**नेवासा । विजय खंडागळे**

नेवासा तालुक्यात झालेली अतिवृष्टी आणि यामुळे झालेले शेतीचे नुकसान यासंदर्भात काँग्रेस व शेतकरी संघटनाचे पदाधिकारी नेवासा तहसीलदारांना भेटले. पीक पाहणी, पंचनामे यातील भानगड टाळून तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई दिली जावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली.




तहसीलदारांशी चर्चा करताना नेवासा तालुक्यातील सर्व मंडळात अतिवृष्टी झाल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आणि यामुळे सर्व शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. सर्व शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला असून, कोणताही शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहू नये, याची दक्षता घेण्यात यावी असे स्पष्ट केले. शासनाने पिकानुसार व क्षेत्रानुसार सरसकट भरपाई द्यावी, अशी मागणी काँग्रेस व शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली. शेतकरी संघटनेचे त्र्यंबक भदगले यांनी सांगितले की, सध्याची स्थिती पाहता या आपत्कालीन परिस्थितीत सरकारने तातडीने शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी आणि शेतकऱ्यांना या अस्मानी संकटातून वाचवावे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी नमूद केले की, दिवसेदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ होत असून, शासनाकडे शेतकऱ्यांकडे लक्ष देण्याची वेळ आली आहे. शासनाने त्वरित कर्जमाफी करावी व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी, अन्यथा मोठे आंदोलन होईल. या वेळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष अंजुम पटेल, भारतीय स्वाभिमानी संघाचे गणपत मोरे, काँग्रेसचे सतीश तऱ्हाल, शेषराव गव्हाणे आदी शेतकरी उपस्थित होते.

**शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही, पिकांना हमीभाव नाही, कांद्याला भाव नाही, अनुदान नाही, कपाशीचे उभे पीक वाया गेले आहे, शेतकरी आत्महत्या वाढत आहेत; तरीही सरकार झोपेचे सोंग घेत आहे. आता वेळ आली आहे की शेतकऱ्यांनी एकजूट होऊन लढावे, असे अंजुम पटेल यांनी स्पष्ट केले.**

# वैविध्यपूर्ण अभियानाचा गौरव

या वर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार दक्षिण भारतातील लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेते मोहनलाल यांना जाहीर करण्यात आला आहे. अलिकडेच, भारत सरकारने २०२३च्या दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी नामांकन जाहीर केली होते. त्यानंतर मोहनलाल यांच्या नावाची सरकारतर्फे घोषणा करण्यात आली. दादासाहेब फाळके पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीनुसार ही घोषणा करण्यात आली. हा पुरस्कार भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. अभिनेते मोहनलाल यांना आज म्हणजे २३ सप्टेंबर २०२५ रोजी ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये हा पुरस्कार प्रदान केला जाईल. दक्षिण भारताने भारतीय मनोरंजन विश्वाला अनेक महान कलाकार दिले त्यातीलच एक म्हणजे मोहनलाल. २१ मे १९६० रोजी केरळातील एलनथूर येथे येथे जन्मलेले मोहनलाल यांचे पूर्ण मोहनलाल विश्वनाथ नायर असे आहे. शालेय वयापासूनच अभिनयाची आवड असलेल्या मोहनलाल यांनी १९७८ साली थिरनोत्तम या मल्याळम चित्रपटातून चित्रपटसृष्टीत प्रवेश केला मात्र हा चित्रपट प्रदर्शित होऊ शकला नाही त्यामुळे १९८० साली प्रदर्शित झालेला मंजिल विरिंजा पुक्कल हा त्यांचा पहिला प्रदर्शित चित्रपट ठरला. विशेष म्हणजे या चित्रपटात त्यांनी नायकाची नाही तर खलनायकाची भूमिका केली मात्र ही भूमिका त्यांनी अशाप्रकारे वठवली की नायकापेक्षा त्यांनी साकारलेला खलनायकच भाव खाऊन गेला. हा चित्रपट त्यांच्यामुळेच हिट झाला. याच भूमिकेने त्यांना चित्रपटसृष्टीचे कवाडे उघडून दिले. या चित्रपटाद्वारे मल्याळम चित्रपट सृष्टीला नवा ताकदीचा अभिनेता मिळाला. हा चित्रपट त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. त्यांच्या घरासमोर निर्माते दिग्दर्शकाच्या रांगा लागल्या. त्यांचे चित्रपट एकापाठोपाठ हिट होऊ लागले. यशस्वी चित्रपटांची मालिकाच त्यांनी सुरू केली. दर पंधरा दिवसांनी त्यांचा एक चित्रपट प्रदर्शित होऊ लागला. विशेष म्हणजे सलग चित्रपट प्रदर्शित होऊनही प्रेक्षकांनी त्यांच्या चित्रपटाकडे पाठ फिरवली नाही कारण प्रत्येक चित्रपटात त्यांनी वेगवेगळी भूमिका साकारली. अभिनयातील वैविध्यामुळे ते आपली लोकप्रियता टिकवून ठेवू शकले. राजविंटे माकन या चित्रपटात त्यांनी साकारलेली डॉनची भूमिका त्यांचा कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. या चित्रपटानंतर त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली. पुलीमुर्गम हा त्यांनी अभिनय केलेला चित्रपट तर सुपरहिट ठरला. हा चित्रपट त्याकाळात सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला . या चित्रपटाने त्या काळात १३० कोटी रुपयांची कमाई केली. दृश्यम या चित्रपटातील त्यांची भूमिका देखील लक्षवेधक ठरली. हा चित्रपट नंतर हिंदीतही आला ज्यात मोहनलाल यांची भूमिका अजय देवगण यांनी केली. अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयाच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी तर त्यांना नऊ वेळा नामांकन मिळाले त्यापैकी ४ वेळा त्यांना हा पुरस्कार मिळाला. वानप्रस्थम या चित्रपटात त्यांनी कथकली नृत्य सादर करणाऱ्या कलाकाराची भूमिका साकारली. या चित्रपटातील त्यांच्या अभिनयासाठी त्यांना पहिल्यांदा सर्वोत्कृष्ट अभिनयाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांनी जवळपास ३०० पेक्षा अधिक मल्याळम चित्रपटात भूमिका केल्या. केवळ मल्याळम नाही तर हिंदीसह अन्य दक्षिण भाषीय चित्रपटातही त्यांनी भूमिका केल्या. दक्षिणेतील इतर अभिनेत्यांप्रमाणे त्यांचेही हजारो फॅन्कलब आहेत. परदेशातही त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. जवळपास चाळीस वर्षांहून अधिक काळ अभिनय क्षेत्रात घालवलेल्या मोहनलाल यांना भारत सरकारने पद्मश्री सारखा मानाचा पुरस्कार देऊनही गौरविले आहे. आता दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवून सरकारने त्यांच्या वैविध्यपूर्ण अभिनय कारकिर्दीचा योग्य गौरव केला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनेते मोहनलाल यांचे मनापासून अभिनंदन!





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# कोणीही खचून जाऊ नये; मदत आणि पाठबळ देण्यासाठी आम्ही कटिबद्ध- आ. मोनिका राजळे

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव तालुक्यातील अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या गावांची पाहणी करून आमदार मोनिका राजळे यांनी ग्रामस्थांना दिलासा दिला. ''या संकटाच्या काळात कोणीही खचून जाऊ नये. आम्ही सर्व आपल्या सोबत आहोत. मदत आणि पाठबळ देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,'' असे आश्वासन त्यांनी दिले. रविवार, ता. २१ सप्टेंबर रोजी आमदार राजळे यांनी वरूर बु/खु., भगुर, खामगाव जुने, जोहरापुर, वडुले बु., लोळेगाव, सामनगाव, मळेगाव शे., आखतवाडे, आपेगाव, ढोरजळगाव/मलकापूर, ढोरजळगाव ने, निंबे, नांदुर, वाघोली, वडुले खु., आव्हाणे बु., आव्हाणे खु., आमरापुर आदी गावांची पाहणी केली. या दौऱ्यात प्रसाद मते, संजय गायकवाड, प्रल्हाद पाठक,



अंकुश जोगदंड, निलेश भाकरे, बापु चव्हाण, अजिनाथ कोठुळे, संदीप शेळके, आनंद रुपनर, प्रविण दहातोंडे, पवार, जाधव, मंडलाधिकारी, मंडल कृषी अधिकारी, तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक यांच्यासह भाजपाचे बापुसाहेब पाटेकर, महेश फलके, संजय टाकळकर, उमेश भालसिंग, गणेश रांधवणे, भिमराज सागडे, शिवाजीराव भिसे, आशाताई गरड, कचरू चोथे, चंद्रशेखर मुरदारे, संदीप वाणी, अनंता उकिर्डे, महादेव पवार, सुभाष बडदे, जगन्नाथ भागवत, कुलदीप फडके, संदीप खरड, सौरभ मुरदारे, तुषार पुरनाळे, सुभाष बरबडे, दादा महाराज देवढे, डॉ. शाम काळे, राजेंद्र आघाव, ज्ञानेश्वर उगले, आप्पासाहेब पुंडेकर, आदिनाथ कापरे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. आमदार राजळे म्हणाल्या, ''मतदारसंघातील अनेक गावे बाधित झाली असून पाऊस थांबत नाही. पुन्हा पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला असल्याने प्रशासनाने सजग राहावे. नागरिक, पदाधिकारी व प्रशासन एकोप्याने काम करून अडचणींवर मात करत आहेत. अनेक गावांमध्ये घरात पाणी शिरले, उभी पिके वाया गेली, जमीन वाहून गेली, रस्ते व पूल तुटले, तर काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व वीजपुरवठ्याची समस्या निर्माण झाली आहे. पिठाच्या गिरण्या बंद असल्याने शेतकरी व गावकरी अडचणीत आहेत.'' तसेच, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून या भागासाठी जास्तीत जास्त मदत मिळविण्याचा पाठपुरावा सुरू आहे. एकही शेतकरी अथवा नागरिक शासनाच्या मदतीपासून वंचित राहू नये यासाठी पंचनाम्याची प्रक्रिया सुलभ करावी. किचकट अटी शिथिल करून सरसकट पंचनामे करण्यात यावेत,'' अशा सूचना आमदार राजळे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या पाहणी दौऱ्यामुळे ग्रामस्थांना दिलासा मिळाला असून प्रशासन व जनप्रतिनिधींचे प्रयत्न पुढील काळात कितपत मदत करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# निस्वार्थीपणे सेवा केल्यास जनता पाठीशी- आ. ओगले

## आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते ३२५ लाभार्थ्यांना गृहोपयोगी भांडी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते बांधकाम कामगार योजने अंतर्गत शहरातील ३२५ लाभार्थ्यांना गृहोपयोगी भांडी संचाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेणारे व या योजनेचा फायदा बांधकाम मजूरांना मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणऱ्या कार्यकर्त्यांचे आमदार ओगले यांनी यावेळी अभिनंदन केले.

मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचा प्रत्येक पदाधिकारी हा सर्वसामान्य जनतेपर्यंत शासनाची प्रत्येक योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहत असून हे निश्चितच समाधानाची




बाब असल्याचे आमदार ओगले म्हणाले.

जनतेची निस्वार्थीपणे सेवा केल्यास जनता आपल्या पाठीशी भक्कमपणे उभी राहते याचा प्रत्यय आगामी निवडणुकीत आल्याशिवाय राहणार नाही, असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी श्रीरामपूर नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, युवक काँग्रेसच्या राष्ट्रीय सचिव दिपाली ससाणे, अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष माऊली मुरकुटे, श्रीरामपूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अण्णासाहेब डावखर, श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष दिलीप नागरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, अतुल खरात, संदीप मगर, सनी मंडलिक, आयाज तांबोळी, संतोष परदेशी, आशा परदेशी, यांच्यासह विधानसभा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते.

# कर्मवीर अण्णा अमर रहे! घोषणांनी दुमदुमले शहर

## कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्त मिरवणूक

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

दीनदलितांच्या घरोघरी भगीरथ प्रयत्नाने शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवणारे, सत्यशोधक समाजाचे प्रवर्तक व रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८ व्या जयंतीनिमित्त श्रीगोंदा शहरात मोठ्या उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात आणि ''कर्मवीर अण्णा अमर रहे'' या घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. रयत संकुलाच्या वतीने काढण्यात आलेल्या या भव्य मिरवणुकीत महादजी शिंदे विद्यालय, श्रीमंत राजमाता कन्या विद्यालय, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय आणि महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महादजी शिंदे विद्यालयाच्या प्रांगणात कर्मवीर अण्णांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. या कार्यक्रमास माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी



सदस्य कुंडलिकराव दरेकर, रयत शिक्षण संस्था उत्तर विभाग सल्लागार समिती सदस्य सुधीर खेडकर, शाळा समितीचे रवीशेठ दंडनाईक, ज्योतीताई खेडकर, तसेच महाविद्यालयीन नियोजन समितीचे व विविध समित्यांचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मिरवणुकीत विविध आकर्षणे विशेष ठरली. महादजी शिंदे विद्यालयाचे झांज पथक, लेझीम पथक, मानवी मनोरे, ढोल-ताशा व स्काऊट पथक प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होते. कन्या विद्यालयाचे झांज पथक व वारकरी दिंडी प्रेक्षकांची मने जिंकणारी ठरली. महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलने सादर केलेले देशभक्तीपर गीत 'मिशन सिंदूर' नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू आणणारे ठरले. महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे शिस्तबद्ध एन.सी.सी. पथक व एन.एस.एस. विभागाचे 'लोकशाहीचे अधिकार, कर्तव्य व जबाबदारी' या विषयावरील पथनाट्य विद्यार्थ्यांना समाजसेवेची प्रेरणा देणारे ठरले. याशिवाय बाबुमिया बँडवाल्यांचे पथक मिरवणुकीची शोभा वाढवणारे ठरले. मिरवणूक मार्गावर युवा उद्योजक महावीर पटवा व शाळा समिती सदस्य रवीशेठ दंडनाईक, विशाल दंडनाईक यांनी विद्यार्थ्यांसाठी पाणी, बिस्किटे व केळीची सोय करून सामाजिक बांधिलकी जपली. मिरवणुकीदरम्यान पालक भगिनींनी औक्षण करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. शहरातील मुख्य रस्त्यांवरून दणदणीत जयघोषात ही मिरवणूक निघून पुन्हा विद्यालयात परतली. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वर्षा भोईटे, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे, इंग्लिश मीडियमच्या मुख्याध्यापिका ज्योती भोपे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले. या भव्य मिरवणुकीमुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार आणि शिक्षणतत्त्वज्ञान पुन्हा एकदा जनमानसात रुजले. श्रीगोंदा शहराने एकतेचा, समाजप्रबोधनाचा आणि शिक्षणप्रेमाचा अद्वितीय संदेश या सोहळ्यातून अनुभवास दिला.

# मुरकुटेंच्या वाढदिवसानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेस उदंड प्रतिसाद

**बेलापूर। शफीक बागवान**

हरिहर फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष विक्रम नाईक तसेच अशोक कारखान्याचे विद्यमान संचालक भगवान सोनवणे यांच्या वतीने माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य मॅरेथॉन स्पर्धेस उदंड असा प्रतिसाद मिळाला त्यात शेकडो स्पर्धकांनी भाग घेत या मॅरेथॉनची शोभा वाढवली. या स्पर्धेत राज्यातील, जिल्ह्यातील तसेच विविध तालुक्यांतील स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. पुरुषांच्या विविध वयोगटांतील शेकडो स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले. प्रारंभी मुरकुटे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून नंतर फीत कापून मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवीत शुभारंभ करण्यात आला. बाल गटातील विजेत्यांना प्रथम – कृष्णा बंडू वाडकर, द्वितीय- श्रीजय मुकुंद वाबळे, आणि तृतीय- सार्थक सुधीर



अमोलीक यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

मोठ्या गटातील स्पर्धकांना मध्ये प्रथम पारितोषिक धर्मेंद्र कुमार प्रजापती , द्वितीय पारितोषिक कृष्णा गायके यांना तर तृतीय पारितोषिक ''प्रसाद गव्हाणे'' यांना मिळाले. यावेळी श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, बेलापूर ग्रामपंचायत सदस्य रवींद्र खटोड, जाकिरभाई शेख, लहानु नागले, भास्करराव बंगाळ, बेलापूर सोसायटीचे माजी चेअरमन शेषराव पवार, अन्वरभाई सय्यद, अशोक कारखान्याचे संचालक निरज मुरकुटे, प्रतीक राजुळे, भाजपा नेते रखमा गाढे, बाळासाहेब लगे, लाडगाव सोसायटीचे संचालक जमशेद पटेल, ज्येष्ठ पत्रकार विष्णुपंत डावरे, सचिन कणसे, दिलीप आमोलिक, अनिल पवार, संजय शेलार आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेच्या यशस्वीते साठी हरिहर फाउंडेशनचे सदस्य भगवानराव सोनवणे, विक्रांत भागवत,अशोक वहाडणे, ऋषिकेश नाईक, सुरेश जाधव,मधुकर ठोंबरे, रवींद्र करपे, चंद्रकांत शेजुळ, सुरेश शेजुळ, बंडूभाऊ जाधव, गोविंद गाडेकर, अकबर भाई बागवान, अमनभाई सय्यद, पोपटराव पांडागळे, विजय कुऱ्हे, सुरज शेलार, सतीश कारले, कैलास आवटी, अर्जुन दोडके, आदित्य नाईक आणि अध्यक्ष विक्रम नाईक यांनी मोलाचे सहकार्य केले. सूत्रसंचालन विजय शेलार व रवींद्र करपे यांनी केले. विशेष सहकार्यामध्ये ॲम्बुलन्स सेवा संतोष शेलार व गणेश टाकसाळ यांनी दिली. पोलीस स्टेशनच्या वतीने हेड कॉन्स्टेबल संपत बडे यांनी सहकार्य केले. क्रीडा शिक्षक प्राध्यापक गावडे यांनी मार्गदर्शन केले तर साऊंड व माईकची व्यवस्था सोमनाथ साळुंखे यांनी केली. आनंद दायमा, दिलीप दायमा, साहेबराव वाबळे, देवराम गाडे, ऋषी नवले, ग्रामसेवक निलेश लहारे व धुमाळ गोविंद भाऊ शिंदे, मयूर भाऊ मोरे यांनीही विशेष सहकार्य केले.